उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.

# महाराष्ट्र शासन

**अल्पसंख्याक विकास विभाग**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**शासन निर्णय, क्रमांक:अविवि-२०११/प्र.क्र. ४४/११/का.६**
**दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०११.**

**संदर्भ :-** १) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शा. निर्णय, क्रमांक अविवि-२००९/प्र.क्र.४६ /०९/का.१, दि. ५/२/२००९.
२) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शा. निर्णय, क्रमांक अविवि-२०१०/प्र.क्र.२१२/०९/का.४, दि. ३/२/२०१०.
३) अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शा. निर्णय, क्रमांक अविवि-२०१०/प्र.क्र.११२/१०/का.६, दि. २२/०७/२०१०.

**शासन निर्णय :-**

राज्य शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख व पारसी या समाजातील तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या होतकरु व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरिता सन २००८-०९ या वर्षात संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केली होती. या योजनेच्या अंमलबजावणीचा गुणात्मक आढावा घेऊन ही योजना काही किरकोळ बदलांसह सुधारित स्वरुपात सन २००९-१० व २०१०-११ मध्येही संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात आली. राज्यभरातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून या योजनेला मिळालेला चांगला प्रतिसाद व या योजनेची सकारात्मक फलनिष्पती विचारात घेऊन, तसेच सदर योजना राबविताना उद्भवणाऱ्या प्रशासकीय अडचणी, योजनेचे स्वरुप व अंमलबजावणीतील किरकोळ उणिवा यांचे निराकरण करुन अल्पसंख्याक समाजातील तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण तसेच इयत्ता बारावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम) राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता ही योजना सन २०११-१२ या वर्षापासून पुढीलप्रमाणे सुधारित स्वरुपात कायम राबविण्यास याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

## भाग-१

**उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यासाठी राबविण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना :-**

### अ) योजनेची व्याप्ती :-

ही शिष्यवृती योजना महाराष्ट्राचा रहिवासी असलेल्या अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता लागू असेल. या योजनेचा लाभ वैद्यकीय व अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम तसेच इतर तांत्रिक व व्यावसायिक

अभ्यासक्रमात पदविका, पदवी तसेच पदव्युत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल.

**ब] उपलब्ध शिष्यवृत्तींची संख्या :-**

या योजनेंतर्गत एकूण १७,५०० नवीन शिष्यवृत्ती उपलब्ध करुन देण्यात येतील. यापैकी वैद्यकिय व अर्धवैद्यकिय, पदविका, पदवी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांत शिक्षण घेत असलेल्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता २५०० नवीन शिष्यवृत्ती व वैद्यकिय व अर्धवैद्यकिय अभ्यासक्रम वगळता उर्वरित तांत्रिक व व्यावसायिक पदविका, पदवी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिकत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता १५,००० नवीन शिष्यवृत्ती उपलब्ध करुन देण्यात येतील. राज्य शासनाने धार्मिक अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या मुस्लीम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख व पारसी या लोकसमूहांच्या राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार पुढीलप्रमाणे अभ्यासक्रम निहाय शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येतील. तसेच यापूर्वी देण्यात आलेल्या शिष्यवृत्तींच्या नुतनीकरणासाठी वेगळया शिष्यवृत्ती देण्यात येतील.

**राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निहाय वितरीत करावयाच्या शिष्यवृत्तींचा तपशील**

| अ.क्र. | अल्पसंख्याक लोकसमूह | वैद्यकीय व अर्धवैद्यकिय अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्तींची संख्या | वैद्यकीय व अर्धवैद्यकिय अभ्यासक्रम वगळता उर्वरित तांत्रिक व व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुस्लिम | १३६३ | ८,१७५ |
| २ | बौध्द | ७६२ | ४,५७५ |
| ३ | ख्रिश्चन | १५० | ९०० |
| ४ | जैन | १७५ | १,०५० |
| ५ | शीख | २५ | १५० |
| ६ | पारसी | २५ | १५० |
| | **एकूण** | **२,५००** | **१५,०००** |

**क ) योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) या योजनेंतर्गत मान्यताप्राप्त वैद्यकीय व अर्धवैद्यकीय तसेच तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये पदवी, पदविका व पदव्युत्तर प्रथम ते अंतिम वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती स्वरुपात आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल. गेल्या शैक्षणिक वर्षात यापूर्वी या योजनेंतर्गत ज्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली होती, त्या विद्यार्थ्यांपैकी संबंधित अभ्यासक्रमाचे मागील शैक्षणिक वर्ष ज्या विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पूर्ण करुन पुढील वर्षात प्रवेश घेतला आहे असे विद्यार्थी, तसेच चालू शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती योजना लागू असेल.

२) मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रमांमध्ये सामायिक प्रवेश चाचणीद्वारे (सीईटी) प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील.

३) जे विद्यार्थी सामायिक प्रवेश चाचणी (सीईटी) न देता उक्त अभ्यासक्रम शिकत असतील, ते विद्यार्थी देखील या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरू शकतील. तथापि, अशा विद्यार्थ्यांची निवड त्यांनी उच्च माध्यमिक / पदवी परीक्षांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांनुसार गुणवत्तेवर आधारित राहील.

४) पदवी व पदविका अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करताना त्यांची गुणवत्ता यादी त्यांनी माध्यमिक/ उच्च माध्यमिक परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार केली जाईल, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी त्यांनी पदवी परिक्षेत अर्जित केलेल्या गुणांच्या आधारे तयार केली जाईल.

५) गुणवत्ता यादी तयार करताना विद्यार्थ्यांना समान गुण मिळाल्याच्या परिस्थितीत ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न कमी असेल त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीकरिता प्राधान्य देण्यात येईल.

६) संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.२५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येईल.

७) या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याला अन्य शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन याचा लाभ घेता येणार नाही.

८) जर एखादया विद्यार्थ्याला वैद्यकीय पदवी, पदव्युत्तर या अभ्यासक्रमाच्या अंतर्वासिता कालावधीत (Internship period) काही पारिश्रमिक मिळत असेल किंवा इतर अभ्यासक्रमांच्या बाबतीत प्रायोगिक प्रशिक्षणाच्या (Practical training) कालावधीत काही भत्ता /विद्यावेतन मिळत असेल तर त्या कालावधीत अशा विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती अदा केली जाणार नाही.

९) संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याने माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.

१०) या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुबांचे सर्व स्त्रोतांद्वारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.

११) स्वयंरोजगार असलेल्या पालकांनी उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र कोऱ्या कागदावर स्वयंप्रमाणित (Self Certified) प्रमाणपत्र स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे. नोकरी करणा-या पालकांच्या बाबतीत नियोक्त्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. विद्यार्थ्याचे पालक उत्पन्न कर भरत असल्यास आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्यात येईल. या प्रमाणपत्रात अल्पसंख्यांक असल्याबद्दलचा उल्लेखदेखील असावा.

१२) या योजनेंतर्गत ३० टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखून ठेवण्यात येतील. एखाद्या अल्पसंख्याक समाजातील मुलींची संख्या लाभार्थींमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्याक समाजातील मुलांमधून शिष्यवृत्ती देण्यात यावी. प्रथम ७०% विद्यार्थ्यांची (मुलींचा समावेश करुन) सर्वसाधारण यादी तयार करण्यात येईल व त्यानंतर ३०%. राखीव मुलींची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल.(७०% मध्ये समावेश असलेल्या मुलींचा अंतर्भाव ३०% राखीव यादीमध्ये नसेल.)

१३) या योजनेंतर्गत एखादया अल्पसंख्याक लोकसमूहाकरिता निश्चित केलेले शिष्यवृत्ती वितरणाचे लक्ष्य गाठले जात नसेल, तर इतर अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्या शिष्यवृत्ती समायोजित करण्यात येतील. मात्र एका प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती मागणी अर्ज कमी असतील तर त्या शिष्यवृत्ती दुस-या प्रवर्गामध्ये संख्येच्या प्रमाणात समायोजित करण्यात येतील.

१४) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करत नसल्याबाबत किंवा संपाचा अवलंब करणे/ संपात सहभागी होणे, संबंधित प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने शिष्यवृत्ती मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल अथवा प्राधिकारी उचित समजतील अशा कालावधीपर्यंत रोखून धरण्यात येईल.

१५) जर एखाद्या विद्यार्थ्यांने चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती मिळविली असल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसूली करण्यात येईल.तसेच अशा विद्यार्थ्याचे नाव काळया यादीत टाकले जाईल व कोणत्याही योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यास अशा विद्यार्थ्यास प्रतिबंधित केले जाईल.

१६) ज्या अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्तीधारकास शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम शिष्यवृत्ती धारकाने मध्यंच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसूल केली जाईल.

१७) सदर शिष्यवृत्तीच्या विहीत अर्जातील अ.क्र. ४ मध्ये नमूद केलेली विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय बँकतील बचत खात्याबाबतची माहिती भरणे आवश्यक राहील.

**ड) योजनेची प्रसिध्दी -**

या योजनेची जाहिरात व प्रसिध्दी "अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी" या योजनेमध्ये प्रसिध्दी व इतर बाबींसाठी राखून ठेवलेल्या तरतुदीतून तसेच या योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणा-या प्रशासकीय व त्यानुषंगीक खर्चासाठी संचालक, तंत्र शिक्षण व संचालक, वैद्यकीय शिक्षण यांना या योजनेसाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण निधीपैकी २% रक्कम प्रसिद्धीसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ही प्रसिध्दी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रातून तसेच अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील मोठया खपाच्या वृत्तपत्रातून व अल्पसंख्याक भाषेतील वृत्तपत्रातून करण्यात येईल.

## भाग-२

**इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमधे शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम) राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना :-**

**अ) योजनेची व्याप्ती :-**

या योजनेतील शिष्यवृत्तीचा लाभ इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमधे शिक्षण घेणाऱ्या (उदा. कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल.

**ब] उपलब्ध शिष्यवृत्तींची संख्या :-**

या योजनेंतर्गत एकूण २००० नवीन शिष्यवृत्ती उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु. ५०००/- या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येईल. तसेच प्रत्येक वर्षात पूर्वी दिलेल्या शिष्यवृत्तींच्या नुतनीकरणासाठी वेगळी शिष्यवृत्ती देण्यात येईल. काही अभ्यासक्रमांचे शुल्क रु.५०००/- पेक्षा कमी असेल तर त्यापैकी अखर्चित राहिलेली रक्कम अल्पसंख्यांक लोकसमूहांच्या प्रमाणात अधिकच्या शिष्यवृत्ती देण्यासाठी अनुज्ञेय असेल. राज्य शासनाने

धार्मिक अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या मुस्लीम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख व पारसी या लोकसमूहांच्या राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार पुढीलप्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येतील.

**राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निहाय वितरीत करावयाच्या शिष्यवृत्तींचा तपशील**

| अ.क्र. | अल्पसंख्याक लोकसमूह | शिष्यवृत्तींची संख्या |
|---|---|---|
| १ | मुस्लिम | १,०९० |
| २ | बौध्द | ६१० |
| ३ | ख्रिश्चन | १२० |
| ४ | जैन | १४० |
| ५ | शीख | २० |
| ६ | पारसी | २० |
| | **एकूण** | **२,०००** |

**क) योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात इयत्ता बारावीनंतरच्या सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये प्रथम वर्ष ते अंतिम वर्षामध्ये शिकत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना ही योजना लागू असेल.

२) मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतेवेळी इयत्ता १२ वी मध्ये प्राप्त केलेल्या गुणांचा विचार करुन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येईल.

३) गुणवत्ता यादी तयार करताना विद्यार्थ्यांना समान गुण मिळाल्याच्या परिस्थितीत ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न कमी असेल त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीकरिता प्राधान्य देण्यात येईल.

४) या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याला अन्य शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन याचा लाभ घेता येणार नाही.

५) संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याने माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.

६) या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे सर्व स्त्रोतांद्वारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.

७) स्वयंरोजगार असलेल्या पालकांनी उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र कोऱ्या पेपरवर स्वंयप्रमाणित (Self Certified) प्रमाणपत्र स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे. नोकरी करणा-या पालकांच्या बाबतीत नियोक्त्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. विद्यार्थ्याचे पालक उत्पन्न कर भरत असल्याचे आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्यात येईल. या प्रमाणपत्रात अल्पसंख्यांक असल्याबद्दलचा उल्लेखदेखील करण्यात यावा.

८) या योजनेंतर्गत ३० टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखून ठेवण्यात येतील. एखाद्या अल्पसंख्याक समाजातील मुलींची संख्या लाभार्थींमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्याक समाजातील मुलांमधून शिष्यवृत्ती देण्यात यावी. प्रथम ७०% विद्यार्थ्यांची (मुलींचा समावेश करुन) सर्वसाधारण यादी तयार करण्यात येईल व त्यानंतर ३०%. राखीव मुलींची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल.(७०% मध्ये समावेश असलेल्या मुलींचा अंतर्भाव ३०% राखीव यादीमध्ये नसेल.)

९) या योजनेंतर्गत एखादया अल्पसंख्याक लोकसमूहाकरिता निश्चित केलेले शिष्यवृत्ती वितरणाचे लक्ष्य गाठले जात नसेल, तर इतर अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्या शिष्यवृत्ती समायोजित करण्यात येतील. मात्र एका प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती मागणी अर्ज कमी असतील तर त्या शिष्यवृत्ती दुस-या प्रवर्गामध्ये संख्येच्या प्रमाणात समायोजित करण्यात येतील.

१०) संबंधित विद्यार्थी स्वतःच्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करत नसल्याबाबत किंवा संपाचा अवलंब करणे/ संपात सहभागी होणे, संबंधित प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने शिष्यवृत्ती मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल अथवा प्राधिकारी उचित समजतील अशा कालावधीपर्यंत रोखून धरण्यात येईल.

११) जर एखाद्या विद्यार्थ्यांने चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती मिळविली असल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसूली करण्यात येईल.तसेच अशा विद्यार्थ्याचे नाव काळया यादीत टाकले जाईल व कोणत्याही योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यास अशा विद्यार्थ्यास प्रतिबंधित केले जाईल.

१२) ज्या अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्तीधारकास शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम शिष्यवृत्ती धारकाने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसूल केली जाईल.

१३) सदर शिष्यवृत्तीच्या विहीत अर्जातील अ.क्र. ४ मध्ये नमूद केलेली विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत बॅकेतील बचत खात्याबाबतची माहिती भरणे आवश्यक राहील.

## भाग - ३

### शिष्यवृत्ती अर्जांची उपलब्धता व योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती:

१) शिष्यवृत्ती योजनेच्या भाग- १ (वैद्यकीय शिक्षण वगळून ) व भाग-२ करिता संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. भाग -१ मधील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीकरीता संचालक वैद्यकीय शिक्षण, वैद्यकीय शिक्षण संचालनालय हे नोडल अधिकारी म्हणून काम करतील.

२) या योजनेतंर्गत नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व मागील वर्षातील शिष्यवृत्तीधारकांच्या शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणाकरिता शिष्यवृत्ती अर्जाचे स्वतंत्र नमुने महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in/www.dte.org.in/www.dmer.org.in/www.dhe.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी नोडल अधिका-याने ठरविलेल्या वेळापत्रक व कार्यपद्धतीनुसार अर्ज सादर करावेत.

३) पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत शिष्यवृत्ती करीता अर्ज करावेत याकरिता सर्व संचालक ( संचालक वैद्यकीय शिक्षण, संचालक उच्च शिक्षण , संचालक, तंत्र शिक्षण, कृषी, पशुवैद्यकीय व मत्स्य अभ्यासक्रम, युनानी, आयुर्वेदिक, इ सर्व विद्यापीठे) यांनी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचित करावे. सर्व संचालकांनी यासंदर्भातील अहवाल नोडल अधिकारी (संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय आणि वैद्यकीय शिक्षण) यांना ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पाठवावे.

४) भाग-२ करिताच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमधे शिक्षण घेणाऱ्या कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी ठरवलेल्या वेळापत्रक व

कार्यपद्धतीनुसार ते शिकत असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे सादर करावयाचे आहेत. तद्नंतर या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची निवड संचालक उच्च शिक्षण , उच्च शिक्षण संचालनालय यांच्याकडून करण्यात येईल व शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित संचालकांनी संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय यांच्याकडे पाठवावे. शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तींची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने संचालक, तंत्र शिक्षण संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत त्या त्या उमेदवारांच्या बँक खात्यात जमा केली जाईल.

५) सदर योजनेंतर्गत समर्पित केलेल्या अथवा विहीत मुदतीत न स्विकारलेल्या शिष्यवृत्ती प्रतीक्षायादी वरील विद्यार्थ्यांना क्रमवारीनुसार देण्यात येतील.

**योजनेंतर्गत निधीची उपलब्धता :-**

या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी लागणारा प्रत्यक्ष निधी अधिक या निधीच्या २% इतकी अतिरिक्त रक्कम (योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या प्रशासकीय व त्यानुषंगिक खर्चासाठी ) संचालक,तंत्र शिक्षण व संचालक, वैद्यकिय शिक्षण यांच्या अधिनस्थ ठेवण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत अल्पसंख्याक विकास विभागाकडून प्राप्त झालेल्या निधीसंदर्भात संचालक (तंत्र शिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (वैद्यकिय शिक्षण), वैद्यकिय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय प्रपंजी खाते (PLA account) व त्या अनुषंगिक अभिलेख ठेवतील व त्याची अल्पसंख्याक विकास विभागाकडून किंवा विभागाने प्राधिकृत केलेल्या अन्य प्राधिकरणाकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येईल.

**शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

शिष्यवृत्ती अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे / प्रतिज्ञापत्रे जोडण्यात यावी.

१) विद्यार्थ्याचे स्वतःची स्वाक्षरी असलेली पासपोर्ट आकाराचे छायाचित्र.

२) विद्यार्थ्याने शालांत परीक्षा व त्यापुढील परीक्षांमध्ये प्राप्त केलेले गुण दर्शविणाऱ्या गुणपत्रिकांच्या साक्षांकीत प्रती.

३) स्वयंरोजगार असलेल्या पालकांनी उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र कोऱ्या पेपरवर स्वंयप्रमाणित (Self Certified) प्रमाणपत्र स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे. नोकरी करणा-या पालकांच्या बाबतीत नियोक्त्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. विद्यार्थ्याचे पालक उत्पन्न कर भरत असल्याचे आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्यात येईल. या प्रमाणपत्रात अल्पसंख्यांक असल्याबद्दलचा उल्लेखदेखील करण्यात यावा.

४) कायम निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा उदा. शिधापत्रिकेची प्रत, वीज/दूरध्वनी देयकाची प्रत, पारपत्राची प्रत, निवडणूक ओळखपत्राची प्रत इ. (कोणतीही एक)

५) आगाऊ पावतीची प्रत. (Advance Receipt)

सदर योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी संचालक, (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.

सदरहू योजनेच्या अंमलबजावणीकरिता संचालक (वैद्यकीय शिक्षण), संचालक (तंत्र शिक्षण), संचालक (उच्च शिक्षण), संचालक (शिक्षण) , कुलसचिव, सर्व विद्यापीठे, आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आपल्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांना अवगत करावे.

या योजनेंतर्गत होणारा खर्च मागणी क्रमांक झेडई-१,मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योंजनातंर्गत योजना (०१)(२०) उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजनेकरिता सहायक अनुदान (२२३५- ए - ३३८) या लेखाशीर्षखाली दर्शविण्यात येईल व त्या त्या आर्थिक वर्षात या शीर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www. maharashtra. gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०१४१४५३२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( उज्ज्वला सं. दांडेकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
संचालक, उच्च शिक्षण, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
आयुक्त ( पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
* पत्राने

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## Minorities Development Department

Form of Application for Scholarship Scheme for Minority(Muslim/Christian/Parsi/Buddhist/Jain/Sikh) Students for pursuing Technical & Professional Studies

**For Office Use Only**

| SL. No. of Application | Year | Course |
|---|---|---|
| | | |

Whether approved ? YES /NO

Paste Latest Passport Size Color Photo with Signature. Do not Staple.

### 1. Personal Details

a. Full Name:

*( As appeard in the HSC/Equivalent Examination)*

b. Fathers' / Husbands' Name

c. Mothers' Name

d. Domicile State :

e. Nationality: Indian

f. Address for correspondence

PIN

g. Tel. No. (With STD)

h. E-Mail

i. Gender (M-Male/F-Female)

j. Date of Birth / / ( D D / M M / Y Y Y Y )

k. Religion (Muslim/Christian/Parsi/Buddhist/Jain/Sikh)

### 2. Qualification Details ( SSC Onward)

| SN | Examination Passed | University / Board Institution / Council of Examination | Year of Passing | Percentage of marks |
|---|---|---|---|---|
| 1 | SSC | | | |
| 2 | HSC | | | |
| 3 | | | | |
| 4 | | | | |

### 3. Total Annual Course fee in Rs. (Do not include refundable deposits)

Tution Fees | Dev. Fees | Other Fees | Total

Total in words : Rs. ____________________

### 4. Details of Saving Bank account of Students

a. Name of the Bank :

b. Full Address

PIN

c. Branch Code d. A.c No

d. MICR NO. of the Bank

5. **Annual Income of Parent / Guardian of the student :** Rs. ____________

(Specimen form of declaration of annual income and minority status on Rs. 100/- non judicial stamp paper is given at Annexure I which is to be signed by the studnet and parent /Guardian of the student. In case parent / guardian are employed, income certif

6. a.Course Name : ____________ **b. Year of Study :** ____________

c. Admission on the Basis of Conpetative exam (Y/N) [ ] If yes, name of CET ____________

7 **Name of the College / Instituion where admitted :**

a. College Name :

b. College Address

c. Telephone No. ____________ d. Fax No. ____________

e. Email Address : ____________

f. Is the college / institution recognized. (Yes / No) [ ]

g. If yes the name of authority which has recogniszed the instituions :

h. To which University / Board is it affiliated :

8 **Documents enclosed with the application**

i) Attested certificates of educational qualification as filled up in para 2.

ii) Income declaration -self attested affidavit on plane paper and income certificate from the employer, if any

iii) Proof of permanent residence ( Domicile Cettificate / Ration Card/ Driving Licence / Electricity Bill/ Indian Passport/ Election ID/ Telephone Bill/ etc)

9. **Declaration**

a I hereby declare that the information given above is correct.

b I shall abide by the terms and conditions for sanction of Scholarship for Minority Students for pursuing Technical & Professional Studies

c I undertake, if it is found that the information given by me is false or if I violate the terms and conditions of the scholarship, the scholarship sanctioned to me, may be cancelled and the entire amount of scholarship will be refunded by me or recovered

Date :

Place :

**Signature of Candidate**

Name ( ____________ )

**( Proforma is filled by the Institute / College Head with official seal)**

10. **Verification of information to be furnished by the Head of Instituion / College :**

It is certified that the information filled above by Shri / Smt. / Kumari ____________
S/O, D/O, W/O Shri ____________ ____________ who is admitted in course ____________ for the academic year ____________ is correct. It is further certified that as per Govt. order G.A.D. No : RAA-2005/89/CR-19/2005/35 dated 9.10.2006, the applicant belongs to ____________ minority community.

Date : ___ / ___ / ___

Place : ____________

**Signature of the Head of Institution /**

# Annexure -I

## DECLARATION OF FAMILY INCOME AND MINORITY STATUS

I ..............................................................(Father /Mother/ Guardian) of...................................................................(Name of Student) who is studying in.....................................................................................hereby declare that my annual income from all sources is Rs ........................................... in word Rs. ...............................................................................................only.

I also declare that I belong to ________________ minority community declared as Minority Community by Government of Maharashtra, General Administrative Department Notification No. RAA/2005/89/C.R.19/2005, dtd 9th November, 2006.

If at any stage, it is found that the information given by me is false/not true, all benefits given to the student under the scheme of "*Scholarship Scheme for pursuing Technical & Professional Studies to the students belonging to Minority Communities*" could be withdrawn and legal action as deemed fit, may be taken against me or my ward.

**Signature Student**

**Signature (Mother/Father/Guardian)**

**Date : ........................**

**Residential Address :**

..........................................................................

.....

..........................................................................

.....

..........................................................................

.....


..........................................................................

.....

## Annexure -II

## Receipt

Received the scholarship through ECS on Bank Account No. ____ __ ______ ____ _____ ___ of ________________ branch _________ / Cheque No. __________ dated _________ for Rs. __________/- (Rs.____________________________________________ ________only ) toward the Scholarship for pursuing Technical & Professional Studies to the students belonging to Minority Communities for the year ________________ .



(Name of Student)

Signature of the Student with

Revenue Stamp

**उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील गुणवत्ताधारक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ६.०० लाखावरुन रु. ८.०० लाख करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्यांक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अविवि-२०१८/प्र.क्र.१८३/का-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०१८

संदर्भ :

१. अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अविवि २००९/प्र.क्र.४६/०९/ का.१, दिनांक ०५/०२/२००९
२. अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अविवि २०१०/प्र.क्र.२१२/०९/ का.४, दिनांक ०३/०२/२०१०
३. अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अविवि २०१०/प्र.क्र.११२/१०/ का.६, दिनांक २२/०७/२०१०
४. अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अविवि २०११/ प्र.क्र.४४/११/ का.६, दिनांक १४/१०/२०११
५. अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : अविवि २०१४/प्र.क्र.००३/१४/ का.६, दिनांक २९/०७/२०१५
६. अल्पसंख्यांक विकास विभाग, अधिसूचना क्र. विकाक २०१५/प्र.क्र.१७७/का.९, दिनांक ०२/०७/२०१६

**प्रस्तावना :**

राज्य शासनाने अल्पसंख्यांक लोकसमूह म्हणून घोषित केलेल्या राज्यातील मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी व ज्यू या समाजातील उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरीता शिष्यवृत्ती योजना संदर्भाधिन क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आल्यानुसार या शिष्यवृत्ती योजने अंतर्गत या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या कुटूंबांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २.५० लाख इतकी विहित करण्यात आली होती. संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयाद्वारे या उत्पन्नमर्यादेत रू. ०६.०० लाखपर्यंत वाढ करण्यात आलेली आहे. आजमितीस अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नमर्यादेत वाढ करून ती रू. ०८.०० लाख करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत संदर्भ क्र. ४ येथे नमूद शासन निर्णयातील अटी व शर्ती मधील अ.क्र.१० येथे नमूद करण्यात आलेली, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची सर्व स्रोतावद्वारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. ०६.०० लाख यावरुन रु. ०८.०० लाख करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. या योजनेच्या उर्वरीत सर्व अटी व शर्ती संदर्भ क्र.४ येथील दि.१४/१०/२०११ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.

३. सदरचा निर्णय हा आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

४. हा शासन निर्णय नियोजन आणि वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२०/२०१८/व्यय -१, दि. ०९/१०/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८११०३१०४७३१३४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2018.11.03 11:54:28 +05'30'

(सं.छ.तडवी)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/विधानपरिषद
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९) सर्व मंत्रालयीन विभाग
१०) महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
१७) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
१८) संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च), पुणे
१९) आयुक्त ( पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे
२०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ( प्रसिध्दीसाठी)
२२) निवड नस्ती